४.२०
१७-२-२०२३
आ.क्र.

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : १७/०२/२०२३

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

दिनांक १८ फेब्रुवारी, २०२३ रोजी उल्हासनगर शहरात मोठया प्रमाणात साजरा होणा-या महाशिवरात्री उत्सवादरम्यान मुख्यत: अंबरनाथ येथील प्राचिन शिवमंदिर परिसर, कैलास कॉलनी, उल्हासनगर-५ व हिराघाट, पवई चौक, उल्हासनगर-३ या ठिकाणी भाविक दर्शनासाठी येत असतात. त्याकरीता रस्ते, मंदिर परिसर इत्यादी ठिकाणची साफसफाई, वैद्यकिय व्यवस्था, दिवाबत्ती, पाणीपुरवठा व्यवस्था, बॅरीकेट, नागरीकांच्या सुविधेसाठी सीसीटिव्ही इत्यादी केलेल्या व्यवस्थेची पहाणी मा. आयुक्त सो. यांनी आज दिनांक १७/०२/२०२३ रोजी संबंधित अधिका-यांसोबत केली. तसेच कोणतीही अडचण निर्माण होऊ नये याकरीता आवश्यक सुचना दिल्या. सहा. आयुक्त तथा प्रभाग अधिकारी व इतर संबंधित अधिका-यांनी पुर्णवेळ उपलब्ध राहुन ऊचित नियोजन करावे याबाबत सुचना देणेत आल्या आहेत.

त्याचप्रमाणे उल्हासनगर शहरात जनहित याचिका क्र.१७३/२०१० अन्वये ध्वनी प्रदुषण होवु नये याकरीता मंदिर परिसरात व यात्रेमध्ये शिटटया, पिपाण्या, भोंगे खरेदी व विक्री करण्यास मनाई करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे उत्सवादरम्यान मंदिर परिसरातील सर्व रस्त्यांवर साफसफाई करणे, स्वच्छता ठेवणे, प्लास्टीक व थर्माकोलचा वापर होणार नाही याची दक्षता घेणे, अनधिकृत मंडप उभारले जाणार नाहीत याबाबत मा. आयुक्त सो. यांनी सर्व संबंधित विभाग तसेच प्रभाग अधिकारी यांना पुर्वसुचना दिलेल्या आहेत.

मा. आयुक्त, श्री. अजित शेख, यांचेसमवेत उपायुक्त (आरोग्य), डॉ. सुभाष जाधव, सहा. आयुक्त तथा, प्रभाग अधिकारी, श्री. गणेश शिंपी, श्री. अजित गोवारी, श्री. तुषार सोनावणे, मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री एकनाथ पवार पहाणी दरम्यान उपस्थित होते.

१७/२/२३

जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत —माहितीस्तव सादर.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१. पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२. सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
सदरची प्रेसनोट उल्हासनगर महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.